नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 31/07/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप

दिनांक 31/07/2020 रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका ''निरोप समारंभाच्या'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या 1) पोलिस उपनिरीक्षक श्री मधुकर चांदेवार, श्वान पथक ना.ग्रा. 2) स.फौ. श्री राजेन्द्र मानीकराव वानखेडे पोलिस मुख्यालय, ना.ग्रा. 3) स.फौ. श्री हुसेनखॉ हमजेखॉ पठाण पोलिस मुख्यालय, ना.ग्रा. 4) स.फौ. श्री अशोक हिराराम मांढरे वाहतुक शाखा ना.ग्रा. 5) स.फौ. प्रभाकर शामराव भोयर नियंत्रण कक्ष ना.ग्रा. 6) पोलीस हवालदार श्री. पुरूषोत्तम एकनाथ मोहड, पोलिस स्टेशन अरोली 7) पोलीस हवालदार श्री. दिपक हिरामन रणदिवे, पोलिस मुख्यालय, ना.ग्रा. 8) पोलीस हवालदार श्री. प्रभाकर हिरामण जुनघरे बिनतारी संदेश ना.ग्रा. यांना पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षकांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, मानवी संसाधन शाखेचे श्री. दिपक वंजारी व कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी (स्टाफ), उपस्थित होते.

## सुगंधित तंबाखु बाळगणाऱ्या आरोपीस अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक 31/07/2020 रोजी 01.00 वा. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. उमरेड परीसरात आरोपी शोध व अवैद्य धंदयावर रेडकामी पेट्रोलींग करीत असता त्यांना मुखबिरद्वारे खात्रीशिर खबर मिळाली की हरीष चमेडीया रा. वार्ड क्र. 9 भिवापूर यांने त्याचे राहते घरात शासनाने बंदी घातलेला सुगंधीत तंबाखु बाळगुन त्याचा विक्री करीता साठा करून ठेवला आहे. अशा मिळालेल्या बातमीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने येथील आरोपी नामे हरीष राजेश चमेडीया वय 35 वर्ष यांचे राहते घरी भिवापूर वार्ड क्रमांक 9 येथे धाड टाकुन आरोपीचे राहते घरातुन 1 जुना वापरता विवो कंपनीचा मोबाईल किंमती 10,000/– रू व वेग–वेगळया कंपनीचा असलेला सुगंधीत तंबाखु एकूण किंमती 3,69,630/– रूपयाचा मुद्येमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने सुगंधीत तंबाखुच्या विक्रीवर व बाळगण्यावर बंदी घातलेली असतांनाही वरील आरोपीने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून सदर सुगंधीत तंबाखुची विक्री करीता भेसळ करून सदर सुगंधीत तंबाखु हा मानवी आरोग्यास अपायकारक असुन त्यामुळे व्यक्तीला विषबाधा होवुन मानवी आरोग्यास धोकादायक असुन त्यापासून मानवी जिवीतास धोका आहे हयाची जाणीव असतांना सुध्दा आरोपीने सुगंधीत तंबाखु नशाकारक, अपायकारक पदार्थ स्वतःजवळ बाळगुन त्याची विक्री केली आहे. त्यामुळे नमुद आरोपी विरूध्द पो. स्टे. भिवापूर येथे कलम 188, 272, 273 व 328 भादंवि कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण, श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. अनिल जिट्टावार, सहा. पोलीस निरीक्षक, श्री. जितेन्द्र वैरागडे, पोहवा संतोष पंधरे, मदन आसतकर, पो.शि. बालाजी साखरे, राधेशाम कांबळे चालक पो.हवा. भाऊराव खंडाते यांनी यशस्वीरत्या पार पाडली आहे.



## मोबाईल चोर अटकेत
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण ची कारवाई

पोलिस ठाणे खापरखेडा हद्दीतील पिपळा डाकबंगला येथील संत गजानन हॉल मध्ये दिनांक 20/01/2020 रोजी एका लग्न संमारंभात फिर्यादी नामे– उत्तम कुमार रामशीलाल कोहली, रा. भोपाल मध्यप्रदेश यांच्या पत्नीचा कोणीतरी अज्ञात चोराने हॅन्डबॅग ज्यामध्ये मोबाईल संच व नगदी 5,000/–रू. असा माल चोयन नेला होता. दिनांक 30/07/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पो. स्टे खापरखेडा हद्दीत पेट्रोलींग कामी फिरत असतांना त्यांना त्यांचे बातमीदारा कडून मिळालेल्या बामती वरून आरोपी नामे क्र. 1) विनोद रमेश इंगुलकर, वय 32 वर्ष, रा. पिपळा डाग बंगला यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याने घटना तारखेच्या दिवशी चोरून नेलेला मोबाईल हजर केला त्यावरून आरोपी जवळील 1 मोबाईल कि. 20,000/–रू. चा जप्त करून जप्त मोबाईल व आरोपी पुढील तपास कामी पो. स्टे. खापरखेडा च्या स्वाधिन करण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा सुरज परमार, निलेश बर्वे, नापोशि सत्यशील कोठारे, पोशि प्रणय बनाफर, विरेन्द्र नरड व चासफौ साहेबराव बहाळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर